# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि. वि. वि. 1351९/२०२२ दिनांक: 13 / 10/२०२२

## परिपत्रक

विषय :– " इंडीयन स्वच्छता लिग " हा उपक्रम महाविद्यालयात यशस्वीरीत्या पार पाडणेबाबत

संदर्भ :– मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/इंडीयन स्वच्छता लिग/मवि–१/२०२२/११८९१ दिनांक २२/०९/२०२२ प्राप्त दिनांक २६/०९/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाना कळविण्यात येते कि, मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांच्या संदर्भिय पत्रान्वये देशातील शहरातील स्वच्छता मोहिमेला गती देण्यासाठी व शहरे कचरामुक्त करण्याच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्रालयाने दिनांक १७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोंबर २०२२ हा पंधरवाडा स्वच्छ अमुत महोत्सव म्हणुन घोषीत केलेला असुन त्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांची रुपरेखा निर्धारीत केलेली आहे. याचीच सुरुवात म्हणुन इंडियन स्वच्छता लिग हि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित केलेली आहे. इंडियन स्वच्छता लिग या स्पर्धेत राज्यातील सुमारे १५० हुन अधिक महानगरपालिका, नगरपरीषदा व नगर पंचायती यांनी सहभाग नोंदविलेला आहे. या स्पर्धेत युवकांचा सहभाग, नाविण्यपुर्ण उपक्रम व उपक्रमाचा परिणाम यावरुन शहरांचे मुल्यमापन केले जाणार आहे. या स्पर्धेमध्ये युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना व इतरही विद्यार्थ्यांना या उपक्रमाची माहिती देऊन सदर उपक्रमामध्ये सहभाग नोदविण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे. जेणेकरुन या स्पर्धेत युवकांचा सहभाग वाढेल असे सदर परिपत्रकात नमुद करण्यात आलेले आहे.

करिता सदर पत्राच्या अनुषंगाने महाविद्यालयात कार्यवाही घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाला सादर करावा.

सहपत्र :– संदर्भीय पत्र

मा. प्र–कुलगुरु यांच्या मान्यतेने

12/10/22

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/ प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.